# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१,फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in   Internet :www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१८/ १८३

दिनांक : 10 OCT 2018

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड आणि संगोपनाबाबत..**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/प्रक्र१५१-१६/आस्था२, दिनांक १५.९.२०१८ रोजीचं पत्र सहपत्रासह सोबत जोडत आहे.

सदर सहपत्रामधील मुद्या क्रमांक १ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यामधील कार्यक्षेत्रात वृक्षलागवडीचे उद्दिष्टाचे वाटप जागेच्या उपलब्धतेनुसार करण्याची कार्यवाही सुरू करावी तसेच मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंदणीबाबत दिलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तत्काळ कार्यवाही सुरु करून याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयास पाठवावा.

तसेच २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड आणि संगोपनाबाबत वरील पत्रामध्ये नमूद केलेल्या इतर मुद्दयांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 8359
दिनांक 16 OCT 2018

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

**क्र. तंशिसं/विकाना/वृक्षलागवड/2018/ 3515**

**दिनांक :** 22 OCT 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे संस्थास्तरावर कार्यवाही करण्यांत यावे. तसेच मुद्या क्र. 02 च्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१,फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१८/ १८३

दिनांक : 10 OCT 2018

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड आणि संगोपनाबाबत..**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/प्रक्र१५१-१६/आस्था२, दिनांक १५.९.२०१८ रोजीचे पत्र सहपत्रासह सोबत जोडत आहे.

सदर सहपत्रामधील मुद्या क्रमांक १ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यामधील कार्यक्षेत्रात वृक्षलागवडीचे उद्दिष्टाचे वाटप जागेच्या उपलब्धतेनुसार करण्याची कार्यवाही सुरू करावी तसेच मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंदणीबाबत दिलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तत्काळ कार्यवाही सुरु करून याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयास पाठवावा.

तसेच २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड आणि संगोपनाबाबत वरील पत्रामध्ये नमूद केलेल्या इतर मुद्दयांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

8359
16 OCT 2018

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी : -
कार्यासन क्रमांक १२ मुख्य कार्यालय, मुंबई यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५१-१६/आरथा२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दु.२२८५५७६६
दिनांक - १५/९/२०१८

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय
३) संचालक, कला संचालनालय
४) संचालक, ग्रंथालय संचालनालय

विषय :- २०१९ मधील १३ कोटी वृक्ष लागवड आणि संगोपणाबाबत.

संदर्भ :-१) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र. सावंवि/ २०१८/प्र.क्र.१४४/फ११ दि.६ सप्टेंबर २०१८

२) शासन परिपत्रक महसुल व वन विभाग क्र.सावंवि २०१८ / प्र.क.१६६/फ ११ दि.७ सप्टेंबर २०१८(www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतांक २०१८०९०७१७३०१४६२१९)

महोदय,

महसुल व वन विभागाचे १२ सप्टेंबर २०१८ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे. सदर पत्रातील मुद्या क्र. १ च्या अनुषंगाने, आपल्या कार्यक्षेत्रात वृक्षलागवडीचे उद्दीष्टाचे वाटप जागेच्या उपलब्धतेनुसार आपल्या अधिनस्त कार्यालयांमध्ये करण्याची कार्यवाही सुरू करावी, तसेच मुद्या क्र.२ च्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंदणीबाबत दिलेले उद्दीष्ट साध्य करण्यासाठी तत्काळ कार्यवाही सुरू करून सदर अहवाल शासनास त्वरित सादर करावा, हि विनंती.

१५/९/१८
(अमोल उगलमुगले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

(२१)

तंत्रशिक्षण संचालनालय
नोंदणी क्र. २३७१
दिनांक २१/९/१८

त तातडीचे
बैठक दि. १७/०९/२०१८
वेळ : दुपारी ३.३० वा.
स्थळ : मंत्रालय मुख्य इमारतीतील
७ व्या मजल्यावरील सभागृह क्र. २

क्र.- सावनि-२०१८/प्र.क्र.१११/फ-११,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १२ सप्टेंबर, २०१८.

प्रति,

सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.

विषय:- सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन आणि पूर्वतयारीबाबत सर्व प्रशासकीय विभागांच्या समन्वय अधिकाऱ्यांची सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक. दि. १७ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी ३.३० वा. सातवा मजला,सभागृह क्र. २

महोदय,

विषयांकित प्रकरणी सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १७ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये खालील विषयाबाबत विचारविनिमय होईल.

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सावनि-२०१८/प्र.क्र.१४४/फ-११ दि. ६ सप्टेंबर, २०१८ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांना जिल्हानिहाय आणि यंत्रणानिहाय वृक्ष लागवडीच्या उद्दिष्ट वाटपाबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देवून नियोजन व पूर्वतयारीबाबत कार्यवाही सुरु करण्याबाबत.
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. सावनि-२०१८/प्र. क्र.१६६/फ-११ दि. ७ सप्टेंबर, २०१८ अन्वये ज्या प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोदंणीबाबत उद्दिष्ट वाटप केले आहे त्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देवून उद्दिष्ट पूर्तीबाबत करावयाची कार्यवाही.
३. प्रत्येक प्रशासकीय विभागांच्या संकेतस्थळावर वृक्ष लागवड व संगोपन (Tree Site) हा विषय अंतर्भूत करून संकेतस्थळ अद्ययावत करणे. या संदर्भात मां. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांनी सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांना लिहिलेले दिं. ३ सप्टेंबर, २०१८ रोजीचे पत्र, कृपया पहावे.
४. शासन पत्र क्र. सावनि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११ दि.१३ ऑगस्ट, २०१८ अन्वये सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व समन्वय अधिकाऱ्यांची दिनांक ३० जुलै २२०१८रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये खालील दोन महत्वाच्या बाबींचा समावेश आहे.
   अ. सन २०१८ मधील आणि त्यापूर्वी झालेल्या वृक्ष लागवडीचे संगोपन आणि सन २०१९ मधील प्रस्तावित ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवडीसाठी पूर्व पावसाळी कामे या करिता सन २०१८-१९ मधील "कार्यक्रमावरील खर्च" या लेखाशिर्षामधून ०.५ टक्के मर्यादेत निधी "कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे ( Re-appropriation ) उपलब्ध करून घेणे.
   ब. सन २०१८-१९ मध्ये "वृक्ष लागवड आणि संगोपन" कार्यक्रमाकरिता नव्याने लेखाशिर्ष करणे.

वरील मुद्यांसह इतिवृत्तात नमूद केलेल्या इतर बाबींसदर्भात पूर्ततेसंदर्भातील अहवाल सादर करणे.

तरी वर नमूद क्र. १ ते ४ बाबत माहिती घेऊन बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांच्या संबंधित समन्वय अधिकारी यांना सूचना द्याव्यात अशी विनंती आहे.

आपला,

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत कार्यवाहीसाठी :-

सर्व प्रशासकीय विभागांचे समन्वय अधिकारी.

प्रत माहितीसाठी :-

१. सचिव (वने) यांचे स्वीय सहायक.
२. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) यांचे स्वीय सहायक.
३. विशेष अधिकारी (वने) यांचे स्वीय सहायक.